# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर
## तालूका खेड, जिल्हा पुणे

## विद्यार्थी विकास मंडळाचा वार्षिक अहवाल (२०१७-१८)

सन २०१७-१८ या शेक्षणिक वर्षामध्ये हुतात्मा राजगुरू महाविद्यालयामध्ये विद्यार्थी विकास मंडळांतर्गत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबविण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मान्यतेनुसार या योजनेची कार्यवाही करण्यात आली. आर्थिकदुष्ट्या दुर्बल, अनुसूचित जाती, जमातीतील विद्यार्थ्यांना अतिरिक्त या योजनेचा लाभ व्हावा याकरिता हि योजना राबविण्यात आली. ग्रंथालय विभाग, परीक्षा विभाग, संगणक विभाग, ग्राहक भंडार विभाग, विविध विज्ञान विभाग, राष्ट्रीय सेवा विभाग, क्रीडा विभाग, प्रशासकीय विभाग, वाणिज्य विभाग, कला शाखेतील काही विभाग, महाविद्यालयीन मैदान, मुक्त विद्यापीठ विभाग कमवा वा शिका विभागातील विद्याथ्यांना विभागून दिले होते. सदर योजनेमध्ये ६४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये ५० विद्यार्थीनी व १४ विद्यार्थी होते. या योजनेअंतर्गत ३,७९,४८५=०० ( तीन लाख एकोनऐंशी हजार चारशे पंच्याऐंशी रुपये) खर्च करण्यात आले

सन २०१७-१८ या शेक्षणिक वर्षामध्ये हुतात्मा राजगुरू महाविद्यालयामध्ये विद्यार्थी विकास मंडळांतर्गत विशेष मार्गदर्शन योजना १० डिसेंबर, २०१७ ते १४ जानेवारी, २०१८ या दरम्यान राबविण्यात आली.या योजनेचा ७०५ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मान्यतेनुसार या योजनेची कार्यवाही करण्यात आली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अनुसूचित जाती,जमातीतील विद्यार्थ्यांनी अतिरिक्त आणि विशेष अध्यापनाचा लाभ व्हावा या करिता या योजनेची कार्यवाही करण्यात आली. या वर्षी विशेष मार्गदर्शन योजनेसाठी प्रथम वर्ष बी.कॉम, प्रथम वर्ष कला, प्रथम वर्ष विज्ञान या वर्गाची निवड करण्यात आली होती. प्रा. घोंगडे, प्रा.ओसवाल, प्रा. बिऱ्हाडे, प्रा.संदीप ढोरे, प्रा. कारले, प्रा.दिलीप मुळूक, प्रा.संदीप थोरात, प्रा.एस.एम.जगताप, प्रा.पी.डी.तनपुरे, डॉ. एस.बी सूर्यवंशी यांनी त्यांच्या विषयासंदर्भात तीन तास अतिरिक्त अध्यापन केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व विद्यार्थी विकास मंडळ,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३,१४,१५ मार्च २०१८ रोजी आमच्या महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बालरोगतज्ञ मा.डॉ.प्रमिलाताई बांबळे यांनी १३ तारखेस महिलांचे आरोग्य याविषयी मार्गदर्शन केले. यानंतर निर्भया पथक खेड विभागाचे पोलिस कॉन्स्टेबल मा.देवाडे संतोष यांनी निर्भया पथकाविषयी माहिती दिली. दि.१४ रोजी मा.मोनिका दौंडकर द नॅशनल पावर मार्शल आर्ट असो.ऑफ महाराष्ट्,चाकण यांनी विद्यार्थीनीसाठी विविध 'जूडो कराटे' प्रात्यक्षिके दाखवून विद्यार्थीनींकडून कृती करवून घेतली. दि.१५ मार्च २०१८ रोजी मा.अजय सांगडे ,ओव्हरऑल ग्रोथ सेन्टर,मंचर यांनी लाठी आणि काठीचे प्रात्यक्षिके दाखवून विद्यार्थीनींना सहभागी करून घेतले.तसेच स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी असणारी आवश्यकता सांगितली. या कार्यक्रमासाठी मोठया संख्येने विद्यार्थीनी उपस्थित होत्या. १३,१४ व १५ मार्च रोजी तीनही कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थीनींना अल्पोपहार देण्यात आला. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मा. प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील,डॉ.एच.एम.जरे,प्रा.व्ही.डी कुलकर्णी ,डॉ.संजय शिंदे ,प्रा.एस.एस.कोळेकर,प्रा.कांबळे वर्षा,प्रा.नीता

Scanned by CamScanner

डोंगरे,प्रा.श्वेतांबरी आल्हाट प्रा.अपर्णा कुलकर्णी,प्रा.शीतल बो–हाडे,प्रा.संदीप ढोरे यांचे अनमोल असे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

तसेच सन २०१७-१८ मध्ये विद्यार्थी विकास मंडळा मंडळांतर्गत विवध उपक्रम राबविण्यात आले. स्वच्छ समर्थ भारत अभियान, न्यू इंडिया मंथन उपक्रम, युवक महोत्सवात सहभाग, राज्यस्तरीय गिर्यारोहण, या सर्व उपक्रमात विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभाग नोंदविला. तसेच विद्यार्थी विकास मंडळा कडून चालू वर्षातील विविध परिपत्रकानुसार त्या संदर्बात योग्य अंमलबजावणी करून अहवाल वेळोवेळी विद्यापीठास पाठविण्यास आले.

डॉ. व्ही.वाय.रासकर
विद्यार्थी विकास अधिकारी
हु.रा.महाविद्यालय,राजगुरूनगर
ता.खेड, जि.पुणे.

डॉ.एस.बी.पाटील
Principal
Hutatma Rajguru Mahavidyalaya
(Arts, Science & Commerce)
Rajgurunagar.

Scanned by CamScanner